जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक **लोकनेता** बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

गुरुवार, दि.६ फेब्रुवारी २०२५


हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४२ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# मातृतीर्थ सिंदखेडराजा नगरीतील मातोश्री मंगल कार्यालय येथे संपन्न होणार बहुजन साहित्य संघाचे साहित्य संमेलन २०२५





जिजाऊंचे जन्मस्थान असलेला राजवाडा मातृतीर्थ सिंदखेड राजा



जगातील तिसऱ्या क्रमांकाचे सरोवर लोणार



राजे लखोजिराव जाधव यांची समाधी असलेले भुमट मातृतीर्थ सिंदखेड राजा



मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील रामेश्वर मंदिर



निळकंठेश्वर बारव मातृतिर्थ सिंदखेड राजा

## याच ऐतिहासिक मातृतिर्थाच्या वैभवात पार पडणार बहुजन साहित्य संघाचे साहित्य संमेलन





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

आज ब.सा.संघाच्या वतीने सिंदखेड राजा येथे एक तातडीची छोटेखानी बैठक घेण्यात आली. त्यामध्ये बहुजन साहित्य संघाच्या ३१ मार्च, २०२५ रोजी मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे नियोजित असलेल्या सहाव्या राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या सोहळ्यासाठी सुंदर, आकर्षक व योग्य असे ठिकाण ठरवण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला. एवढेच नाही तर त्या निमित्ताने सिंदखेड राजा येथील मातोश्री मंगल कार्यालय येथे ब. सा. संघाचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार कस्तुरे यांनी संघाचे पदाधिकारी व दैनिक लोकनेता चे संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांच्यासह भेट देऊन स्थानिक मातोश्री मंगल कार्यालयाचे मालक संचालक मा. शिवप्रसाद ठाकरे यांच्याशी चर्चा करून मातृतिर्थ सिंदखेड राजा नगरी खऱ्या अर्थाने विकासापासून वंचित असल्या कारणाने महाराष्ट्रातील सूज्ञ साहित्यिकांच्या व विचारवंतांच्या नजरेस ही वस्तुस्थितीआणून देणे व शासनाचे या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करणे यासाठी होत असलेल्या ब. सा. संघाच्या प्रस्तावित साहित्य संमेलनाची रूपरेषा व उद्दिष्ट त्यांच्यासमोर विषद केली. व दि.३१ मार्च, २०२५ रोजी मातोश्री मंगल कार्यालय सदर संमेलन सोहळ्यासाठी उपलब्ध करून देण्याची विनंती केली. आणि त्यांनी सुद्धा अत्यंत मोठ्या मनाने त्या विनंतीचा मान ठेवून, अशा ऐतिहासिक व अविस्मरणीय तथा वैशिष्ट्यपूर्ण संमेलनासाठी मातोश्रीचा हातभार लागण्याची संधी मिळाली, असे आनंदाने जाहीर करून या साहित्यजत्रेसाठी आपला सहर्ष सहभाग नोंदवला. याबद्दल त्यांचे हार्दिक आभारासह, बहुजन साहित्य संघाच्या वतीने डॉ. कस्तुरे तसेच ज्ञानेश्वर बुधवत यांनी, अभिनंदन करून त्यांना मनापासून धन्यवाद दिले. या बैठकीस भावकवी अंकुश पडघान व इतर मान्यवर उपस्थित होते. बहुजन साहित्य संघाच्या दि. ३१ मार्च, २०२५ च्या नियोजित, मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरी येथे संपन्न होऊ घातलेल्या राज्यस्तरीय सहाव्या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने विचारात असलेले मातृतिर्थ बुलढाणा जिल्ह्याच्या विकासाचे प्रस्तावित मुद्दे पुढीलप्रमाणे.....

१) बहुजन साहित्य संघाचे साहीत्य संमेलन २०२५ मातृतीर्थ सिंदखेड राजा येथे संपन्न व्हावे.

२) या साहित्य संमेलनात महाराष्ट्र व महाराष्ट्रा बाहेरील मान्यवर साहित्यिक मंडळी, लेखक, कवी इत्यादींचा समावेश असावा.

३) या संमेलनासाठी परीसरातील नागरीकांसोबतच स्थानिक शासन प्रशासनाचा सुद्धा सहभाग असावा.

४) संमेलनाच्या पूर्वतयारी व संपन्नतेसाठी साहित्यिक व कार्यकर्त्यांची संमिती किंवा मंडळ असावे.

५) या संमेलना मध्ये वृत्तपत्रिय व वृत्तवाहीनी क्षेत्रामधील संपादक, पत्रकार, इत्यादी सर्व मान्यवरांचा सहभाग असावा.

६) या संमेलनासाठी सामिजिक, शैक्षणिक, सांकृतिक, क्रिडा तसेच राजकिय क्षेत्रातील मान्यवरांचे निस्पृह सहकार्य असावे.

७) या संमेलनाच्या निमित्ताने प्रस्तापितांच्या बरोबरच नवोदित लेखक, कवी, व साहित्यिकांना संधी मिळावी.

८) संमेलनातून मातुतीर्थ जिल्हाच्या सर्वांगीण विकासाच्या मुद्यांवर चर्चा व्हावी / परीसवांद व्हावा.

९) नागरीकांच्या मानवाधिकारांची तसेच संविधानाद्वारे मिळालेल्या मुलभूत अधिकार व कर्तव्ये यांची ओळख नागरीकांमध्ये निर्माण व्हावी.

१०) संमेलनासाठी केंद्रीय मानवाधिकार संगठन, नई दिल्ली यांचा सहभाग असावा.

११) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरी येथे राष्ट्रमाता जिजाऊ महिला विद्यापीठ असावे, यासाठी शासनाला साकडे घालावे.

१२) मातृतीर्थ जिल्ह्यातील विश्व विख्यात लोणार सरोवराच्या विकासामध्ये सरोवराच्या डोंगरकड्यांवरून पुर्व पश्चिम रोप वे साठी ( भूवैज्ञानिक विचारांतर्गत अध्ययनानुसार ) प्रस्ताव शासनासमोर मांडावा.

१३) मातृतीर्थ जिल्ह्यामध्ये विमानतळ असावे. जगप्रसिद्ध लोणार तसेच शेजारीच अजिंठा लेणी असल्यामुळे जिल्ह्यात ही सुविधा असण्यासाठी प्रस्ताव मांडावा.

१४) जिल्ह्यातील बुलढाणा शहरास टेकूनंच असलेल्या राजूर घाटातील प्रचंड डोंगरकडे विचारात घेता तेथे सुद्धा रोप वे बनवून पर्यटनाची व्यवस्था व्हावी.

१५) बुलढाणा शहराला जड वाहनांच्या वाहतूकीमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याने चिखली रोड वरील साखळी फाट्यापासून, पश्चिमे कडून शहराला वळसा घालणारा वळण मार्ग (बायपास), घाटामधुन घाट रस्ता बनवावा लागला तरी, बनवण्यात यावा.

१६) सर्व सुशिक्षित व बेरोजगार तरुणांना व महीलांना औद्योगिक क्षेत्रात सामावून घेणाऱ्या योजना शासनाने त्वरेने राबवाव्यात.

१७) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीत मुला– मुलींचे शासकीय वसतीगृह असावे.

१८) संत चोखामेळा यांचे गाव, उपेक्षित मेहूणा राजाचा तीर्थक्षेत्र या नात्याने त्वरेने सर्वांगीण विकास होईल यावर भर देण्यात यावा.

१९) सिंदखेड राजा परिसरातील सर्व ऐतिहासिक स्थळांचे जतन व सौंदर्यीकरण करण्याला विशेष प्राधान्य देण्यात यावे.

२०) मातृतीर्थ सिंदखेड राजा नगरीमध्ये भव्य ग्रंथदालन व अध्यासन केंद्र असावे.

२१) मातृतीर्थ सिंदखेड राजा शहरामधून गेलेल्या नागपूर – पुणे महामार्गावरील जड व जलदगती वाहनांची वर्दळ लक्षात घेता शहराला वळण मार्ग असावा.....

२२) फुले आंबेडकरी विचाराचा व संविधानिक सामाजिक समरसतेचा प्रचार व प्रसार व्हावा...


इ. महत्त्वाचे विषय या संमेलनाच्या माध्यमातून विचारात घेऊन शासन प्रशासनाने त्यावर त्वरेने लक्ष केंद्रित करण्यासाठी विचार विनिमय करण्यावर भर कसा देता येईल यास्तव संमेलन मैलाचा दगड ठरेल अशी अपेक्षा बैठकीत व्यक्त करण्यात आली.



ऐतिहासिक चांदणी तलाव मातृतीर्थ सिंदखेड राजा



ऐतिहासीक मोती तलाव मातृतीर्थ सिंदखेड राजा



रंगमहाल मातृतीर्थ सिंदखेड राजा



निळकंठेश्वर मंदिर मातृतीर्थ सिंदखेड राजा

# आ.ॲड.श्रीजया अशोकराव चव्हाण यांच्या वतीने 'युवा उमेद' भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

मेळावापूर्व प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी शनिवारी सकाळी ९.०० वाजता. शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर, जि. नांदेड येथे आयोजित भव्य रोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त तरुण-तरुणींची निवड व्हावी, या हेतूने आमदार ड श्रीजया चव्हाण यांनी 'युवा उमेद' अंतर्गत फेब्रुवारी महिन्यात भोकर विधानसभा मतदारसंघातील गावोगावी मेळावापूर्व प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. अर्धापूर तालुका प्रशिक्षण कार्यक्रमाचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरुवारी सकाळी १०:०० वाजता, दाभड येथे खालील गावांचे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.
१) दाभड २) पिंपळगाव ३) शेलगाव बुद्रुक ४) शेलगाव खुर्द ५) बामणी ६) वाहेदपुर ७) जांभरून ८) कलदगाव

दिनांक ६ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरुवारी सकाळी ११:०० वाजता, येळेगाव येथे खालील गावांचे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.
१) येळेगाव २) देगाव बुद्रुक ३) नांदला,दिग्रस ४) बारसगाव ५) आमदाबाद ६) आमराबाद तांडा ७) आमरापूर ८) खैरगाव

दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सोमवारी दुपारी ४:०० वाजता, पार्डी (म.) येथे खालील गावांचे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.
१) पार्डी (म.) २) देळुब बुद्रुक ३) पांगरी ४) देळूब खुर्द ५) शेनी ६) कारवाडी

दिनांक १० फेब्रुवारी २०२५ रोजी सोमवारी सायंकाळी ५:०० वाजता, लहान येथे खालील गावांचे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.
१) लहान, लहान तांडा, महादेव तांडा २) लोणी बुद्रुक ३) लोणी खुर्द ४) आंबेगाव ५) पाटनुर ६) चेनापूर, चेनापुर तांडा ७) बेलसर ८) शहापूर, हमरापुर

दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरुवारी दुपारी ४:०० वाजता, कामठा येथे खालील गावांचे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.
१) कामठा २) मेंढला बुद्रुक ३) मेंढला खुर्द ४) गणपुर ५) कोंढा ६) भोगाव ७) खडकी,सांगवी ८) निजामपूर

दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी गुरुवारी दुपारी ५:०० वाजता, मालेगाव येथे खालील गावांचे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.
१) मालेगाव २) उमरी ३) सावरगाव ४) धामदरी ५) देगाव कु. ६) डौर

दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रोजी रविवारी सायंकाळी ५:०० वाजता, अर्धापूर शहर येथे युवा रोजगार मेळावापूर्व प्रशिक्षक होणार आहे.



# नागेश्वर ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ सोहळा उत्साहत साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**



श्रीनागेश्वर कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बाभुळगांव येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी इ.१० वी इ.१२ वी च्या शैक्षणिक संकुलामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देणार निरोप समारंभ सोहळा कार्यक्रमाचे अध्यक्ष आशाताई पांडे,के.वाय.सोनुने केंद्रप्रमुख तर प्रमुख पाहुणे रिल स्टार अँक्टर सोनुचे मम्मी-पप्पा योगेश गोरे यांच्या हस्ते स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, विद्येची जननी व समस्त स्त्रीयांना शिक्षणाची वाट दाखवऱ्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार वाहुन दिप प्रज्वलित करून पुजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी पुजा गावंडे,ऋतुजा जंजाळ,राजकन्या शेजोळ,निकीता एडके,पुष्पा गिरणारे, मयुरी गंगावते,योगिता गावंडे, ऋतुजा लुटे,पल्लवी शिंदे,भाग्यश्री झगरे,आरती गिरणारे, ओम थोरात,सतिष गिरणारे, बी.पी.सोळके, निखील राऊत,प्रणव थोरात, वैभव राऊत,कृणाल इच्चे,कृणाल मतकर,ओम अवसरमोल, रोहित मगरे,दत्ता मतकर, शंकर सुसर,प्रमेश्वर गावंडे ,मंथन सराफ,प्रतिभा गावंडे,यांनी कॉलेज आणि गुरूजन यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले.

गटशिक्षणाधिकारी शाहगडकर साहेब,पी.एस.आय.सागर शिंदे साहेब भोकरदन, के.वाय.सोनुने केंद्र प्रमुख, व्हि.आर.शेळके,जयंत कुलकर्णी मुख्यध्यापक ,प्रा.डि.आर.शेळके,यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यासाठी मार्गदर्शन केले. प्रा.आर.ई.पाटिल, प्रा.पी.डि.शेजवळकर, व्हि,व्हि, पाटील, अनिता अग्रवाल, रवि गावंडे,पंडित गावंडे,दिलदार शाहा,हरूण पठाण,भगवान तात्या गिरणारे भाजपा किसान तालुका अध्यक्ष,डॉ.गणेश पोटे,दिलीप सुरडकर,भगवान जंजाळ,भरत राऊत,रूस्तुम गावंडे,आनंदा बाबा, दत्तु जंजाळ,जी.ए.जैन,देऊबा मैंद,पाडुरंग गंगावते,बाबुराव सुरशे,सुनिल दळवी,केशव गिरणारे,भरत राऊत,कृष्णा गोरे,तुकाराम खेडेकर, राजु गिरणारे आदिनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# रामदास पाटील सुमठाणकर यांची राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी दिव्यांग सेलच्या राज्य कार्याध्यक्ष पदी निवड



लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई । प्रतिनिधी**

दि.५ फेब्रुवारी २०२५ रोज बुधवारी राष्ट्रवादी भवन मुंबई येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्यांचे उपमुख्यमंत्री आदरणीय मा.ना. अजितदादा पवार साहेब यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा.खा.सुनीलजी तटकरे साहेब यांनी रामदास पाटील सुमठाणकर याची महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी दिव्यांग सेल च्या राज्य कार्याध्यक्ष पदी नियुक्ती केली.

या नियुक्तीचे पत्र देतांना पक्षाचे महासचिव मा.आ.शिवाजी गरजे साहेब
यावेळी कंधार लोहा विधानसभेचे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब,मा.आ.राजू भैय्या नवघरे आणि इतर मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. या क्षेत्रात व्यापक काम करण्याची ही एक मोठी संधी असून नक्कीच या संधीचं सोने करतील सर्वस्तरावर पक्ष संघटन वाढीसाठी निरंतर प्रयत्न करतील असे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांनी त्यांचे कौतुक करून पुढील भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# कन्या शाळेत आनंदनगरी चिमुकल्या विद्यार्थिनींनी घेतला उत्स्फूर्त सहभाग

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**



शालेय विद्यार्थ्यांसाठी कौशल्य गुणांना वाव मिळावा व व्यवहारात निपुण व्हावे, भविष्यातील व्यवसायिक संधीची जाणीव व्हावी म्हणून उस्माननगर( ता.कंधार ) येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्या शाळेत आठवी पर्येतच्या मुलीनी बाल आनंद मेळावा आनंद नगरी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जि.प . कन्याशाळा उस्माननगर प्रशालेत कौशल्य विकास अंतर्गत नाविन्यपूर्ण आनंद नगरीचे . आयोजन करण्यातआले. गावच्या प्रथम नागरिक सरपंच सौं शोभाताई काळम व केंद्रीय मुख्याध्यापक श्री .खान यांच्या हस्ते आंनद नगरीचे उद्घाटन करण्यात आले . उपस्थितांनी आनंदनगरीत स्टॉल मांडणाऱ्या विद्यार्थिनीच्या स्वादिष्ट पदार्थाचा आस्वाद घेतला व कौतुक केले. परिसरातील नागरिक व पालक शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य अशोक घोरबांड ,संतोष काळम , शिवहार घोरबांड यांनी भेट दिली.इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी उन्नती साखरे हिने भाजी विक्रेता होऊन लक्ष वेधले. या उपक्रमात शाळेतील ३५ विद्यार्थीनीनी सहभाग नोंदवला.

# वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल बिलोलीत डॉक्टरांचा सन्मान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**



बिलोली येथील उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षक डॉ.पांडुरंग पावडे,जनरल सर्जन डॉ. आश्विनी आन्नमवार यानी वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने सन्मान करण्यात आले.डॉ पावडे यांनी हरनीया,हड्रोसील, कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया, तर डॉ आन्नमवार यांनी धर्माबाद,मुखेड, मुदखेड, किनवट ,बिलोली , हरणीया,हड्रोसील, कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया, विविध प्रकारच्या गाठी, जवळ पास दोनशे , शस्त्रक्रिया केली आहे. त्या बद्दल आज दि. ५ जानेवारी मंगळवार रोजी अ.भा.भ्र.समितीच्या वतिने सत्कार करण्यात आले. या वेळी स्त्री रोग तज्ञ डॉ सावरगावे, डॉ विजय कुमार मोरे, डॉ सुनिल कदम, डॉ मदनुरे भुल तज्ञ, अधिपरिचारीका अश्विनी पाटील, यांचा ही सत्कार करण्यात आले.

या वेळी समितीचे राष्ट्रीय सरचिटणीस राजु पाटील शिंपाळकर, जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे, सामाजिक कार्यकर्ते सय्यद रियाज , तालुकाध्यक्ष गंगाधर शिंदे, राजाबाई भरांडे, शेख आस्मा,दिपिका पांचाळ, अनिता चिंचाळकर, राजेश्वरी वाघमारे, अदी उपस्थित होते.

# आम्ही सावित्रीच्या लेकी ग्रुपच्या वतीने अभिनव प्रयोग



लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

जिजाऊच्या लेकी आम्ही
सावित्रीच्या लेकी आम्ही
माय माऊलींचा करू सन्मान
हळदी-कुंकवाचा मान

घरोघरी हळदी कुंकू समारंभ आपल्या संपूर्ण खराडी चंदननगर वडगावशेरी भागात पहिल्यांदाच हा अभिनव उपक्रम राबवला जात आहे. यानिमित्ताने प्रभागातील सर्व माता भगिनी ना त्यांच्या दारात जाऊन हळदी कुंकवाचा मान, सन्मान देण्यात आला.यामुळे प्रभागातील माता-भगिनी च्या अडी-अडचणी समजून घेण्यासाठी खुप उपयोग झाला. यानिमित्ताने खराडी चंदननगर वडगावशेरी प्रभागातील जनतेच्या अडचणी समस्या जाणून घेता आल्या सर्व स्तरातील महिला भगिनींनी या उपक्रमाचे कौतुक केले एवढ्या वर्षात आमच्या दारात कधीही कोणीही राजकीय,सामाजिक, क्षेत्रात काम करणारे व्यक्ती आलेल्या नाहीत फक्त निवडणूकीसाठी,मतदान मागण्यासाठी येतात परत ५ वर्षात कोणीही कधी फिरकत नाही परंतु आपण या हळदी कुंकू उपक्रमासाठी आलात आम्हाला खूप आनंद झाला अशा भावना अनेक माता भगिनींनी बोलून दाखवल्या. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. तेजश्रीताई बाळा पऱ्हाड, कुं.कल्याणी बाळा पऱ्हाड, सौ.शुभांगी खताडे,सौ.प्रणिता चावांडके ताई नी सहकार्य ,परिश्रम घेतले. एकमेकींच्या आयुष्यातील सुख दुःख, समस्या,अडचणी जाणुन घेण्यासाठी ह्या कार्यक्रमाचं मात्र निमीत्त.

# कंधार तालुक्यातील कुरुळा येथील रस्त्यांवरील अतिक्रमनावर हातोडा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर केली थेट कार्यवाही !

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील कुरुळा गावांतील अंतर्गत रस्त्यांवर गत अनेक वर्षापासुन करण्यात आलेल्याअतिक्रमणावर जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार बुलडोजर चालवून प्रशासनाने रस्ता मोकळा केला आहे.लवकरच या रस्त्यांच्या कामास सुरवात होणार आहे,

कंधार तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे गाव असलेल्या कुरुळा येथे गावांतील पाचशे मिटर लांबीच्या असलेल्या अंतर्गत रस्त्यांवर अनेकांनी अतिक्रमन करून बस्तान मांडले होते. कांहीनी तर पक्की बांधकामे केली होती. या रस्त्या कामासाठी अनेक वेळा निधीही मंजूर झाला होता परंतु अतिक्रमणामुळे कामात अडथळा येत असल्याने निधी परत गेल्याचे सांगण्यात येते.

आता पुन्हा एकदा शासनाच्या वतीने पाचशे मिटरच्या या रस्त्यांवर सिमेंट कॉंक्रेट रस्ता व नालीचे बांधकाम काम करण्यासाठी जवळपास दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. परंतु अतिक्रमणांमुळे रस्त्यांचे काम परत रखडूनये यासाठी दि.२७ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.यावेळी संबंधित अधिकारी,कर्मचाऱ्यांनी दोनशे मिटर रस्त्यांवर अतिक्रमणा संदर्भात माहिती दिली. जिल्हाधिकारी यांनी अतिक्रमण काढण्याचे आदेश दिले.जिल्हाधिकारी यांच्या आदेशानंतर स्थानिक प्रशासनाच्या वतीने पोलिस बंदोबस्तात अतिक्रमण हटवण्यात आले.यावेळी कंधार सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उप अभियंता सुमित पाटील,शाखा अभियंता बि.एन.शेंबाळे, नायब तहसीलदार उत्तम मुदीराज, ग्राम महसुल अधिकारी पी.एम.बोड्डावार, सहायक पोलिस निरीक्षक कोकाटे, बिट जमदार टाकरस, शिपाई माधव धुळगंडे, शेषेराव बोराळे , मामडे, चोंडे, बास्टेवाड, अलमगिर यांची उपस्थिती होती. अनेक दिवसांपासुन रस्त्यांवर असलेले अतिक्रमण हटवल्याने गावकऱ्यांत आनंदाचे वातावरण दिसुन आले,

# मराठवाड्यातला सततचा दुष्काळ हा भूतकाळ ठरावा यासाठी येत्या दोन वर्षात नदी जोड प्रकल्प मार्गी लावणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लाखोंच्या समुदायासमोर आश्वासन







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मराठवाड्यातल्या अनेक पिढ्यांनी दुष्काळ अनुभवला आहे परंतु पुढच्या पिढीला दुष्काळी परिस्थितीला तोंड द्यावे लागण्याची वेळ येणार नाही कारण पश्चिम महिन्यांची वाया जाणारे पाणी मराठवाड्याच्या हक्काचे पाणी आपण मिळवणार असून नदीजोड प्रकल्पातून मराठवाड्यात साठी ५३ टीएमसी पाणी आपण मिळवणार असून त्याद्वारे मराठवाड्यातील शेतकरी शेतमजुरांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणणार आहोत आपलं सरकार हे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणार सरकार आहे त्यामुळे या सर्वसामान्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत असे असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पाच्या जलवाहिनी बोगद्या च्या कामाचा शुभारंभ करताना ते बोलत होते सन २०१९ मध्येच याचा शासन निर्णय झाला होता परंतु दुर्दैवाने सरकार गेले आणि दोन वर्ष वाया गेली मात्र एकनाथजी शिंदे साहेबांचे नेतृत्वाखाली पुन्हा सरकार स्थापन झाल्यानंतर दोन वर्ष सतत प्रयत्न करून या कालावधीमध्ये चार नदी जोड प्रकल्प राबवून मराठवाडा विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी योजनांवर विचार करण्यात आला आणि मराठवाड्यातला सततचा दुष्काळ हा भूतकाळ ठरावा असे काम सुरू झाले सन २२ मध्ये मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे नेतृत्वाखाली पुन्हा सरकार स्थापन झाल्यानंतर या कामाची सुधारित प्रशासकीय मान्यता पहिल्याच बैठकीत देण्यात आली होती आमदार सुरेश धस यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे न होणारे काम झाले असून यापुढे देखील आणखी चार टीएमसी पाणी देण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून पश्चिम वाहिनीचे वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात आणायचे आहे त्या पाण्यातून मराठवाड्यातल्या कानाकोपऱ्यात पाणी उपलब्ध करून देण्यात येईल मराठवाड्याच्या मागच्या पिढीने दुष्काळ पाहिला परंतु या पुढच्या पिढीला दुष्काळाला तोंड देण्याची वेळ येणार नाही असे सरकार काम करत असून पश्चिम महाराष्ट्रातील माणदेश हा एकेकाळी दुष्काळी म्हणून त्यावर कथा कादंबऱ्या लिहिल्या गेल्या परंतु आज संपूर्ण माणदेश हा पाणीदार झालेला आहे त्याचप्रमाणे मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळवण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी ज्याप्रमाणे प्रयत्न केले हे न होणारे काम त्यांच्या प्रयत्नातून झाले असून पुढचं काम म्हणजे आणखी चार टीएमसी पाणी आणि गोदावरी खोऱ्यातील तुटीचे पाणी आपण मराठवाड्यासाठी आणू आणि पाणी मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचवू अनेक प्रकल्प उपसा सिंचन योजना या विजयच्या बिला अभावी बंद झालेल्या आहेत हा खर्चात बचत व्हावी यासाठी आपण या उपसा सिंचन योजना यापुढे सोलरवर करणार असून खुंटेफळ साठवण तलावा ही योजना देखील सोलरवर घेण्यात आली आहे त्याचबरोबर शेतकऱ्यांना दिवसा १२ तास वीज पुरवठा व्हावा यासाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असून सोळा हजार मेगा वॅट वीज निर्मिती करून मार्च २७ पर्यंत प्रकल्प पूर्ण होऊन बाराही महिने दिवसा वीर तेही मोफत देण्याचा निर्णय झाला असून सौर ऊर्जा निर्मितीमुळे घरगुती ग्राहकांना देखील यापुढे कमी दरामध्ये वीज उपलब्ध करून देऊन ग्राहकांना दिलासा देण्याचा प्रयत्न करत आहोत याचा विश्वास मी तुम्हाला आज या प्रसंगी देतो असे सांगत सध्याच्या बीड जिल्ह्यातील परिस्थितीबाबत भाष्य करताना ते म्हणाले की आपण सर्व शिवछत्रपतींचे मावळे आहोत सर्व जाती धर्मांना घेऊनच एकत्रित नांदावे लागणार आहे त्यामुळे आपण जातीपातीचा विचार न करता अठरा पगड जातींना एकत्र करून चांगले वातावरण निर्मिती करू बीड जिल्ह्याची थोर परंपरा स्वर्गीय प्रमोद महाजन गोपीनाथरावजी मुंडे यांच्या सारख्या महान व्यक्तींचा हा बीड जिल्हा असून सध्याचा जो बीडचा इतिहास आहे तो आपण पुसून टाकावयाचा असून पूर्वीचा बीडचा गौरवशाली इतिहास पुढे सुरू ठेवावा यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत स्वर्गीय संतोष देशमुख निर्घृणपणे खून करण्यात आला अशा घटना खपवून घेतल्या जाणार नाहीत यामध्ये कोणालाही सोडणार नाही असा इशारा दिला.

# मातृतिर्थ सिंदखेड राजा येथे क्रांतीसुर्य स्व.अण्णा साहेब जावळे पाटील यांचा स्मृतिदिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**




सिंदखेड राजा येथे क्रांतीसुर्य स्व.अण्णासाहेब जावळे पाटील यांचा स्मृतिदिन अखिल भारतीय छावा संघटने च्या वतीने आज तारीख ५ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी नगर टि पॉइंट येथे असंख्य पदाधिकाऱ्यांच्या वतीने साजरा करण्यात आला.या प्रसंगी अशोक राजेजाधव पाटील जिल्हाध्यक्ष छावा संघटना बुलडाणा, संतोष राजेजाधव छावा जिल्हा उपाध्यक्ष,कृष्णा कोल्हे छावा जिल्हा कार्याध्यक्ष,बाळासाहेब शेळके छावा विधानसभा अध्यक्ष,अमोल राजेजाधव देऊळगाव राजा तालुका अध्यक्ष, नारायण म्हस्के सोशल मीडिया प्रमुख छावा संघटना,आदी पदाधिकारी तसेच याप्रसंगी चंद्रकांत साबळे माजी उपनगराध्यक्ष सिंदखेड राजा, शिवादादा पुरंदरे जिल्हाध्यक्ष म विद्यार्थी सेना, अतिश राजेजाधव जिल्हा उपाध्यक्ष महाराष्ट्र नवनिर्माण वि सेना, रफीक पाटिल, एकनाथ म्हस्के,वैजनाथ कूडे मा सरपंच, शाम राठोड, प्रल्हाद राठोड, प्रकाश आढे आदी सिंदखेड राजा तालुक्यातील शहर आणि ग्रामीण भागातील आदी प्रमुख व्यक्तीं उपस्थित होते.

# सेनगाव रिसोड महामार्गावर भीषण अपघात एकाचा जागीच मृत्यूचा एक जण गंभीर जखमी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगाव रिसोड महामार्गावर कवठा पाटी जवळ ५ फेब्रुवारी रोजी भीषण असा अपघात झाला असून या अपघातामध्ये एकाचा जागीच मृत्यू तर एक गंभीर जखमी जखमींना हिंगोली या ठिकाणी नेण्यात आले सेनगाव तालुक्यातील कवठा पाटील जवळ स्कूल बस व मोटरसायकलचा भीषण अपघात झाला या अपघातामध्ये एकाचा मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला असून गंभीर जखमीला हिंगोली येथे नेण्यात आले तर स्कूलबस चालक कवठा–पाटीपासून सेनगाव कडे स्कूल बस घेऊन एक ते दोन किलोमीटर अंतरावर गाडी सोडून पळ काढला, घटनास्थळी सेनगाव पोलीस स्टेशनचे जाधव, सुरदिसे, अंभोरे, यांनी पाहिनी केली असता सदरची स्कूल बस नवीन असल्याचे आढळून आले, स्कूल बस चालकाने पळत काढण्याने पुढील तपास सेनगाव पोलीस स्टेशनच्या वतीने करण्यात येत आहे,

# दीनदयाल विद्यालयात हळदी कुंकू आणि मातृ संमेलन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । प्रतिनिधी**



शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित दीनदयाल विद्यालय व कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय दे.राजा जि बुलढाणा येथे सोमवार दि. ०३ फेब्रु. २०२५ रोजी हळदी कुंकू आणि मातृ संमेलन संपन्न झाले.

शिक्षण प्रक्रियेत महिला पालकांचा सहभाग वाढावा तसेच शाळा आणि समाजातील नात्याचे बळकटीकरण व्हावे ह्या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रासंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी सौ.शीलाताई गारडे,उपविभागीय ,सौ. वर्षाताई कायंदे,माजी नगर सेविका सौ.शारदाताई जायभाये प्राचार्य श्री. एस.बी गारडे सर पर्यवेक्षक श्री.एस. एन. व्यास सर आदी उपस्थित होते. दरम्यान आपल्या अध्यक्षीय भाषणात सौ.शीलाताई गारडे यांनी पाल्याच्या प्रगतीत महिला पालकाची अर्थात आईची भूमिका अधिक महत्त्वाची असल्याचे सांगितले. या संपुर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.सीमा काळे मॅडम आणि सौ.प्रिया तायडे मॅडम यांनी केले,प्रास्ताविक नागरे मॅडम यांनी केले तर. सौ.जयश्री बिडवे मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य श्री.गारडे सर आणि पर्यवेक्षक श्री. व्यास सर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका तसेच शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# वाघोलीत प्रवाशांसाठी बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**




वाघोलीतील पीएमपीएल बस स्थानकालगत असलेल्या सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाली आहे. शौचालयाचे दरवाजे तुटलेल्या अवस्थेत असून सांडपाणी रस्त्यावर येत आहे.यामुळे याची दुर्गंधी बस स्थानकात पसरली आहे. स्वच्छतागृहात पाणी नसल्यामुळे घाण पसरली आहे. प्लॅस्टिक बाटल्यांचा खच पडल्यामुळे नागरिकांची गैरसाय होत आहे. पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे मधुमेह रुग्णांसह बस स्थानकातील प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पालिकेने याकडे तातडीने लक्ष घालून सार्वजनिक शौचालयाची साफसफाई करून डागडुजी करावी, अशी मागणी प्रवासी आणि आजबाजूच्या व्यवसायकांकडून केली जात आहे.बस स्थानकातील प्रवाशी, कर्मचारी यांच्यासाठी सार्वजनिक शौचालय पालिकेच्या वतीने बांधण्यात आले आहे.त्यामुळे नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. वाहतूकही मोठ्या प्रमाणात असते.

या सार्वजनिक शौचालयांचे दरवाजे गायब झाले आहेत. शौचालयात सांडपाणी साचल्याने दुर्गंधी पसरली आहे. गेल्या आठवड्यापासून मलमूत्र बाहेरील रस्त्यावर येत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. माय माऊलींची कुचंबना होत आहे.

# प्रति वर्षाप्रमाणे धारुर शहरामध्ये राष्ट्रसंत भगवान बाबा यांची पुण्यतिथी सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धारूर । प्रतिनिधी**

संत भगवान बाबांनी वंजारी समाजामध्ये जन्म घेऊन सर्व जाती धर्मातील भेद बाजूला सारून समाजाचा उद्धार के ल्याचे रामायणचार्य रामराव महाराज ढोक यांनी सांगितले.धारूर येथे श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या वतीने श्री संत भगवान बाबा पुण्यतिथी निमित्त दोन दिवशी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कीर्तन महोत्सवात सांगता कार्यक्रमात मंगळवारी सकाळी १० ते १ दरम्यान ह भ प रामराव महाराज ढोक यांचे काल्याचे किर्तन झाले. त्यांनीये दशे चरित्र केले नारायणे। सांगता गोधने राखीताहे या संत तुकाराम महाराजांच्या अभंगावर निरूपण केले.

ह भ प ढोक म्हणाले की संताकडे यश, श्री, औदार्य, ज्ञान वैराग्य, ऐश्वर्य हे सहा गुण असतात हे सहाही गुण संत भगवान बाबाकडे होते. त्यांनी सर्व जाती धर्मातील लोकांना शिक्षणाचा मार्ग दर्शविला होता वंजारी समाजामध्ये जन्म घेऊन सर्व जाती धर्मातील समाजाचा त्यांनी उद्धार करण्याचे काम संत भगवान बाबांनी केली आहे. संत हे शांत, विवेकी असतात असेही ह भ प ढोक म्हणाले त्यांनी ग्रामीण भागात स्वतः फिरून सर्व जाती धर्मातील लोकांना दिशा देण्याचे कार्य केले होते असे संत होणे कठीण असते असे सांगून रामराव ढोक यांनी श्रीकृष्णाचेही चरित्र यावेळी उपस्थित भाविकांना सांगितले कार्यक्रमानंतर भाविकांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी मोठ्या प्रमाणात परिसरातील महिला पुरुष भाविक उपस्थित होते.



# मनुष्य जीवनात साधूसंतांच्या कृपेशिवाय प्रगती अशक्य-महंत दत्ता महाराज गिरी

## श्रीक्षेत्र गोरक्षनाथगडावर हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

## वै.वामन गिरी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त भाविकांचा जनसागर उसळला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**





मनुष्य जीवनात प्रत्येकाने साधु संतांचे आशीर्वाद घेतले पाहिजेत कारण संत हे पृथ्वीतलावर देवाचा अवतार घेवून जन्म घेतात. तर संत कृपेसाठी प्रत्येकाने या ज्ञानयज्ञ मंडपात आले पाहिजे. देव, संत आणि आपण एकरुप झालो की तो काला होतो. परमार्थात भक्तीतल्या काल्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तर मनुष्य जीवनात साधूसंतांच्या कृपेशिवाय प्रगती करणं अशक्य आहे. असे प्रतिपादन श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांनी व्यक्त केले. श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव (ता.गेवराई) येथे वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत ह.भ.प.वामन म. गिरी यांच्या ५३ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी महंत ह.भ.प दत्ता म. गिरी यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी भक्तमंडळींनी महंत दत्ता महाराज यांचे ढोलताशासह टाळ मृदगांच्या गजरात भव्य मिरवणूक काढून जल्लोषात स्वागत केले.

यावेळी युवा नेते रणवीर पंडित, भाजप तालुकाध्यक्ष प्रकाश सुरवसे, भाजप समन्वयक श्रीकांत सानप, परमेश्वर म.वाघमोडे, दामोदर भोसले, पांडुरंग म.जाधव, सुघोष मुंडे , शिवाजी म.गिरी, जेष्ठ पत्रकार सुभाष सुतार, पत्रकार विनोद नरसाळे, संपादक अमोल वैद्य, कैलास म.गिरी, नामदेव म.पौळ, तुकाराम म.गिरी, उमेश भोसले, श्रीधर पौळ, दादाभाऊ घुगे, पत्रकार विनोद पौळ, आबासाहेब शेंबडे , रामबप्पा लेंडगुळे, बंडू बावचकर यांच्यासह संत-महंत व विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना दत्ता महाराज म्हणाले की, संत हे समाजाच्या कल्याणासाठी काम करतात म्हणून परमार्थात मन लावून संतांच्या चरणाशी रहा. तसेच जीवनात मिळालेल्या संपत्तीचा सत्कार्यासाठी उपयोग करा.साधूचे देव ऐकतो. साधू धर्माचे पालन करतात. श्री क्षेत्र गोरक्षनाथगड हे परिसराचे वैभव आहे. नाथ परंपरेची जो सेवा करतो त्यास कशाचीही कमतरता भासत नाही. वै.वामन महाराज हे थोर महान तपस्वी पुरुष होते. ते समाजासाठी शेवटपर्यंत झिजले त्यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी होते. त्यांच्या आशीर्वादाने गोरक्षनाथगडाची महती दिवसेंदिवस वाढत आहे. संताचे मन विशाल असते, त्यांच्याशी स्नेह राहू द्या परमार्थात मन स्थिर राहते. संताच्या आधाराने जगणे सुंदर करता येते देवाची संगत धरून चालत रहा. तसेच प्रत्येकाने ज्ञानेश्वरीचे वाचन करा तुळशीला पाणी घाला आईवडिलांची सेवा करा असा मौलिक सल्लाही त्यांनी शेवटी बोलताना दिला. यावेळी पंचक्रोशी परिसरातील सुप्रसिद्ध गायक, वादक, मृदंगाचार्य तसेच दिनानाथ गुरुकुल वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी यांची साथ-संगत लाभली. कीर्तनानंतर उपस्थित हाजारो भाविकांना कवडगाव येथील जगन्नाथ सुखराम भोसले यांच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी सांगता सोहळ्यास महिला व पुरुष भाविकांचा अक्षरक्षा: जनसागर उसळला होता.

# शासकीय कार्यालयामध्ये सौरऊर्जेच्या वापरा कडे विशेष लक्ष द्या-उपमुख्यमंत्री अजित पवार





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

केंद्र व राज्य शासनाच्या अक्षय ऊर्जा निर्मिती संदर्भात सर्व जिल्ह्यांनी सकारात्मकतेने काम करावे. जिल्ह्याच्या वार्षिक आराखड्यामध्ये शाळा, कार्यालयांच्या सौर ऊर्जे संदर्भात प्रस्तावाचा समावेश करावा, अशी सूचना राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केली.

उपमुख्यमंत्री कार्यालय मंत्रालय मुंबई येथून सर्व जिल्ह्यांच्या जिल्हा वार्षिक योजना ( डीपीसी ) संदर्भातील राज्यस्तरीय बैठक दृकश्राव्य माध्यमाद्वारे घेण्यात आली. या बैठकीला मंत्रालयातून इतर मागास बहुजन कल्याण,पशुसंवर्धन,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे,आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, यांची उपस्थिती होती. बैठकीला वित्त नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल, नवी दिल्लीवरून राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण,अप्पर मुख्य सचिव राजगोपाल वर्मा,वित्त व नियोजन विभागाचे वरिष्ठ अधिकारी दृकश्राव्य माध्यमाने उपस्थित होते.तर नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातून दृकश्राव्य माध्यमातून आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, सहाय्यक जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा नांदेड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे व सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी लोकप्रतिनिधींनी गाव तिथे स्मशानभूमी, पानंद रस्ते, शाळांची दुरुस्ती, मराठवाडा मुक्ती संग्राम कार्यक्रमांसाठी वाढीव निधी, माळेगाव यात्रा, जलजीवन मिशन, नव्या रोहित्रांसाठी वाढीव निधी, तसेच शाळा व सर्व शासकीय कार्यालयांवर सोलर सिस्टम बनविण्या बाबतची मागणी केली.उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व लोकप्रतिनिधी व जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावाला समजून घेतले. उपस्थित लोकप्रतिनिधींच्या प्रारूप आराखड्यासंदर्भातील मतांना लक्षात घेतले. मुख्यमंत्र्यांसोबतच्या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्याच्या अंतिम आराखड्याला मान्यता देण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.तत्पूर्वी, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२५-२६ च्या प्रारूप आराखड्याचे सविस्तर सादरीकरण केले. जिल्ह्यासाठी नियोजन विभागाने दिलेल्या रुपये ४७७.४७ कोटी मर्यादेत आराखडा सादर करून विविध योजनेसाठी रुपये २०० कोटींची अतिरिक्त मागणी यावेळी करण्यात आली.

# सिंदखेडराजा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी म्हणून अंकुश म्हस्के रूजू!

## प्रभारी गटविकास अधिकारी मुकेश माहोर हे अर्जित रजेवर गेल्याने पंचायत समितीचे कृषी अधिकारी म्हस्के यांच्याकडे प्रभार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेडराजा येथील गटविकास अधिकारी श्रीकृष्ण वेणीकर यांची बदली झाल्याने देऊळगाव राजा पंचायत समिती चे गटविकास अधिकारी मुकेश माहोर यांच्याकडे प्रभारी गटविकास अधिकारी पदाचा पदभार मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा यांच्या आदेशाद्वारे सोपविण्यात आला होता. श्री.एम.एस. माहोर हे दि. ०३.०२.२०२५ पासुन अर्जित रजेवर गेले असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा यांनी या वेळी पंचायत समिती चे कृषी अधिकारी म्हस्के यांच्याकडे दि. ५ फेब्रुवारी पासून अतिरिक्त गट विकास अधिकारी या पदाचा पदभार एका आदेशान्वये दिला असून. त्यांनी आजपासून पदभार स्वीकारला आहे.



पुढील आदेश येई पर्यंत गट विकास अधिकारी म्हणून अंकुश म्हस्के हे काम करणार असून ते पंचायत समिती सिंदखेड राजा येथे कृषी अधिकारी या पदावर रुजू असल्याने संपूर्ण तालुक्यामध्ये यांची जवळीक निर्माण झाली असून नागरिकांच्या समस्या सोडवण्यास ते नेहमी कटिबध्द असतात. अशातच त्यांना प्रभारी का होईना गटविकास अधिकारी पदाचा पदभार मिळाल्याने नागरिकांमध्ये सुद्धा संतुष्टेची भावना निर्माण झाली आहे. प्रभारी गट विकास अधिकारी माहोर हे देऊळगाव राजा कधी सिंदखेड राजा, सुट्टी तर कधी फोन न उचलणे अशा अनेक कारणाने नागरिकांच्या समस्ये ची कारण बनत चालले होते. मात्र आता फोन उचलून लोकांच्या समस्या सोडवनारे कृषी अधिकारी म्हस्के हे गटविकास अधिकारी या पदावर असल्याने नक्कीच नागरिकांना आपल्या संबंधित कामा मध्ये त्यांचे सहकार्य लाभणार आहे.

# पुस्तकांसह माणसंही वाचता यायला हवीत-नारायण सुमंत

## प्रा.डॉ.उमेश मुंडेच्या हस्ते काव्यसंमेलनचे उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर कासार । वार्ताहर**

समाजातील अस्थिरता कवीला मांडता यायला पाहिजे. लोकांच्या भाषेत व्यक्त झाल्याशिवाय समाजाशी संवाद होणार नाही. लौकिक जगण्याच्या अनुभवाला छेद जाता लेखणी उचलायला हवीत. प्रतिभावान हा उत्तम कार्यकर्ता असला तरच तो स्वतःचा व्यासंग वाढवू शकतो असे प्रतिपादन सोलापूर चे प्रसिद्ध कवी नारायण सुमंत यांनी केले. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित प्रजासत्ताक दिन विशेष ३५ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनात ते अध्यक्षपदावरून बोलत होते. या काव्य संमेलनाचे उद्घाटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर अभ्यास मंडळाचे सदस्य तथा जालना येथील जेष्ठ समीक्षक प्रा.डॉ.उमेश मुंडे यांनी केले.



एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, प्रदेश प्रवक्ता मल्हारी खेडकर, विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी राजेश रेवले (अंबाजोगाई), शिवाजी नामपल्ले (लातूर), शंकर राठोड (नांदेड), अशोक शर्मा (श्रीगोंदा), मनोज अग्रवाल (संभाजीनगर), सचिन चव्हाण (अहिल्यानगर), युवाकवी सिद्धेश पाटील (कोल्हापूर) या निमंत्रित मान्यवरांसह इतरही कवी कवयित्रींनी आपल्या दमदार रचना सादर करून रसिक प्रेक्षकांना तब्बल दोन तास खिळवून ठेवले. या संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन एकता फाउंडेशन शेवगाव तालुका सचिव कवी निलेश मोरे यांनी केले.

या ऑनलाईन काव्य संमेलनाच्या यशस्वीतेसाठी एकताचे उपाध्यक्ष नितीन कैतके, मिरा दगडखैर, सल्लागार एड.भाग्यश्री ढाकणे, महिला आघाडी प्रमुख रंजना फुंदे, संस्थापक सदस्य डॉ.सचिन सानप, शिवचरित्रकार कैलास तुपे, राजेश बीडकर, व्यंगचित्रकार दिपक महाले, डॉ.शोभा सानप, शोभा राजळे, रंजना डोळे, लता बडे, हरिप्रसाद गाडेकर, पो.कॉ.ज्ञानेश्वर पोकळे, फौजी कैलास खेडकर, महादेव राऊत, प्रा.महेश नागरे, अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पत्रकार बाळासाहेब कोठुळे, प्रदेश युवक निमंत्रक इम्रान शेख, युवक प्रतिनिधी छगन पालवे, शिरूर तालुका विद्यार्थी आघाडी प्रमुख कार्तिक कांबळे यांनी परिश्रम घेतले.

# मुंबई कल्याण नगर परळी प्ररामा १६ रस्त्यावर करोडोंची उधळपट्टी

## मनसेचे कैलास दरेकर यांची चौकशीची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

२०२१ ते २०२४ याकाळात वार्षिक देखभाल दुरुस्ती करण्याच्या नावाखाली जवळपास दहा कोटी रूपयांचा खर्च मुंबई-कल्याण -नगर -परळी रस्ता प्ररामा-१६ या रस्त्यावर दि.३१/१२/२०२१ मध्ये १८/७०० ते २२/७००,४ किमी साठी १० लाख रुपयांची दुरुस्ती,तसेच ४९/०० ते ५१/५००, २.५० किमी साठी ११ लाखांचा खर्च तसेच ५७/०० ते ५९/००,२ किमी साठी १० लाखांचा खर्च ६१/५०० ते ६३/५००, २ किमी साठी १० लाखांचा खर्च तसेच ७३/०० ते ७५/५००, २.५० किमी साठी १० लाखांचा खर्च,तसेच ७९/०० ते ८१/००,२ किमी साठी १० लाखांचा खर्च तसेच ८१/५०० ते ८४/००, २.५० किमी साठी १० लाखांचा खर्च दि.२७/५/२०२२ या काळात याच रस्त्यावर १८/६७० ते ६३/६७०, ४५ किमी साठी जवळपास ७४ लाखांचा खर्च तसेच ६३/६७० ते १०८/६७०, ९ किमी साठी ३२ लाखांचा खर्च दि.१९/१२/२०२२ मध्ये १०६/०० नळकांडी पुल पुनर्बांधणीसाठी १० लाखांचा खर्च, तसेच १०६/३०० नळकांडी पुलासाठी १० लाखांचा खर्च तसेच १०६/३०० सी.सी ड्रेन साठी १० लाखांचा खर्च,जुलै २०२२ डोंगरकिन्ही पिंपळवंडी अमळनेर ७३ ते ८५ रस्ता सुधारणा नावाखाली ५ कोटी ९६ लाखांचा खर्च या कामाबाबत यापूर्वी तक्रार दाखल केली आहे.दि.९/६/२०२३ या २ किमी साठी १० लाखांचा खर्च तसेच याच काळात देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली १ कोटी २२ लाखांचा काम याच काळात ६३/६७० ते ७३/०० या ९ किमी साठी २५ लाखांचा खर्च एवढा खर्च करून रस्त्याची दुरवस्था झाली आहे या दुरवस्थेची जबाबदारी नेमकी कुणाची का भ्रष्ट अधिकारी जबाबदार का कंत्राटदार या काळात या रस्त्यावर पाटोदा येथील तत्कालीन उपअभियंता साबळे,शिरूर येथील तत्कालीन उपअभियंता कृष्णा पाण संबळ,तत्कालीन कार्यकारी अभियंता प्रवीण मार्कंडे,तत्कालीन शाखा अभियंता कृष्ण पानसंभळ, नेमकी जबाबदारी कोणाची या भ्रष्टाचाराला संबंधित कंत्राटदाराला कोण पाठीशी घालते यावरून स्पष्ट दिसतं की सदर रस्ता फक्त आणि फक्त भ्रष्टाचाराचं कुरण झालेला आहे याची सखोल चौकशी होऊन भ्रष्टाचाराचा कुरन बनलेल्या रस्त्याला यामधून बाहेर काढणे गरजेचे आहे वरील सर्व कामांची चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मनसेचे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केली आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904